**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.महासभेपुढे घेण्यांत येणा-या विषयांची यादी.**

| विषय क्र. | विषय |
|---|---|
| ४४ | अहमदनगर महानगरपालिकेमध्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २० अन्वये मा.स्थायी समिती सदस्यपदी १६ (सोळा) सदस्यांची प्रमाणशिर प्रतिनिधीत्व देवुन नामनिर्देशनाव्दारे नियुक्ती करणे बाबत... |
| ४५ | अहमदनगर महानगरपालिकेमध्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० अन्वये विशेष समिती अंतर्गत महिला व बालकल्याण समितीच्या सदस्यपदी १६ (सोळा) सदस्यांची प्रमाणशिर प्रतिनिधीत्व देवुन नामनिर्देशनाव्दारे नियुक्ती करणे बाबत... |
| ४६ | अहमदनगर महानगरपालिकेमध्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या) नियम २०१२ अन्वये प्रमाणशिर प्रतिनिधीत्व देवुन नामनिर्देशनाव्दारे नामनिर्देशित ५ (पाच) सदस्यांची नियुक्ती करणे बाबत... |

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

यांस वरील यादी मधील विषय क्र.................... ते .................... या प्रकरणी निर्णय घेणे कामी ............... वार दिनांक / ०२/२०१४ रोजी सकाळी / दुपारी .................. वाजता मा.विशेष सभा / मा.सर्वसाधारण सभा बोलावण्यांत यावी.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

जा.क्र.अम / सका - ०५ / २०१४.
महानगरपालिका सचिव कार्यालय.
दिनांक : ०७ / ०२ / २०१४.

**अहमदनगर महानगरपालिकेच्या विशेष सभेची सुचना.**

( महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे नियम २० अन्वये स्थायी समिती सदस्य पदी व नियम ३० अन्वये महिला व बालकल्याण समिती सदस्यपदी व नामनिर्देशित सदस्य नियुक्त्या नियम २०१२ अन्वये नियुक्ती साठी )

सभा क्रमांक ०५ , दिनांक १५ - ०२ - २०१४.

प्रति,

सन्मा.श्री. / श्रीमती.......................................................

सदस्य,
अहमदनगर महानगरपालिका,
अहमदनगर.

महोदय,

यांस-

याद्वारे कळविण्यांत येते की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये मा.महापौर यांनी अहमदनगर महानगरपालिकेची विशेष सभा शनिवार दिनांक १५ - ०२ - २०१४ रोजी दुपारी १.०० वाजता नविन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील सभागृहात सोबतच्या विषय पत्रिकेतील कामकाज चालविण्यांसाठी आयोजित केली आहे.

आपणांस सभेस उपस्थित राहण्यांची विनंती करण्यांत येत आहे.

सोबत : १. विषय पत्रिका
२. टिपणी.

प्र.नगर सचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

## **अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

सभा क्रमांक ०५ शनिवार दिनांक १५ - ०२ - २०१४ रोजी दु. १.०० वां होणा-या विशेष सभेची

विषय पत्रिका.

**-- * --**

| **विषय क्र.** | **विषय** |
|---|---|
| ४४ | अहमदनगर महानगरपालिकेमध्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २० अन्वये मा.स्थायी समिती सदस्यपदी १६ (सोळा) सदस्यांची प्रमाणशिर प्रतिनिधीत्व देवुन नामनिर्देशनाव्दारे नियुक्ती करणे बाबत... |
| ४५ | अहमदनगर महानगरपालिकेमध्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० अन्वये विशेष समिती अंतर्गत महिला व बालकल्याण समितीच्या सदस्यपदी १६ (सोळा) सदस्यांची प्रमाणशिर प्रतिनिधीत्व देवुन नामनिर्देशनाव्दारे नियुक्ती करणे बाबत... |
| ४६ | अहमदनगर महानगरपालिकेमध्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या) नियम २०१२ अन्वये प्रमाणशिर प्रतिनिधीत्व देवुन नामनिर्देशनाव्दारे नामनिर्देशित ५ (पाच) सदस्यांची नियुक्ती करणे बाबत... |

मा.महापौर सो यांचे मान्यतेने.
दिनांक : ०७ -०२-२०१४.

प्र.नगर सचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**टिप्पणी.**

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.
नगरसचिव विभाग.-
दिनांक : ०७ /०२/२०१४.

**विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेमध्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २० अन्वये मा.स्थायी समिती सदस्यपदी १६ सदस्यांची नेमणुक प्रमाणशिर प्रतिनिधीत्व देवुन नामनिर्देशनाव्दारे करणे बाबत...

संदर्भ :- महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण/ २०१०/प्र.क्र.८५/नवि-३२ मंत्रालय मुंबई दिनांक ६ जुलै २०१०.

सादर,

अहमदनगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक - २०१३ नंतर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३१ (अ) नुसार प्रमाणशिर प्रतिनिधीत्व देवुन समित्यांवर नामनिर्देशनाव्दारे नियुक्ती करणे बंधनकारक झालेले असल्याने समितीवर पालिका सदस्यांचे नामनिर्देशन करतांना मा.विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडेस संबंधित पक्षांची गटनोंदणी आवश्यक असल्याने निवडुन आलेल्या व गटनोंदणी झालेल्या पक्षनिहाय संख्याबलानुसार मा.स्थायी समिती सदस्यपदी नियुक्त करावयाचे सदस्यांबाबतचा तक्ता खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| अ) | एकुण सदस्य संख्या | - | ६८ |
| ब) | नियुक्त करावयाची सदस्य संख्या | - | १६ |

...२

**क) एकुण सदस्य संख्या ÷ नियुक्त सदस्य संख्या = प्रती सदस्य मुल्य.**

**६८ ÷ १६ = ४.२५**

| अ.नं. | पक्ष | संख्या बळ सदस्य मुल्य | पक्ष निहाय सदस्य मुल्य | नियुक्त सदस्य संख्या | | पक्ष निहाय नियुक्त करावयाची सदस्य संख्या. |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | प्रथम स्तर | व्दितीय स्तर | |
| **१** | **२** | **३ ४** | **५** | **६** | **७** | **८** |
| १ | शहर विकास आघाडी | २२ ÷ ४.२५ | ५.१७ | ५ | -- | ५ |
| २ | भारतीय कॉंग्रेस | ११ ÷ ४.२५ | २.५८ | २ | -- | २ |
| ३ | शिवसेना व अपक्ष विकास आघाडी | १८ ÷ ४.२५ | ४.२३ | ४ | -- | ४ |
| ४ | भारतीय जनता पक्ष | ९ ÷ ४.२५ | २.११ | २ | -- | २ |
| ५ | महाराष्ट्र नवनिर्माण सेना | ४ ÷ ४.२५ | ०.९४ | -- | १ | १ |
| ६ | अपक्ष | १ ÷ ४.२५ | ०.२३ | -- | -- | -- |
| ७ | अपक्ष | १ ÷ ४.२५ | ०.२३ | -- | -- | -- |
| ८ | अपक्ष | १ ÷ ४.२५ | ०.२३ | -- | -- | -- |
| ९ | अपक्ष | १ ÷ ४.२५ | ०.२३ | -- | -- | -- |
| | एकुण | | | १३ | १ | १४ |

मा.आयुक्त सो यांचे मान्यतेने.

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**टिप्पणी.**

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.
नगरसचिव विभाग.-
दिनांक : ०७ /०२/२०१४.

विषय :- अहमदनगर महानगरपालिकेमध्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० अन्वये विशेष समिती अंतर्गत महिला व बालकल्याण समितीच्या सदस्यपदी १६ सदस्यांची नियुक्ती प्रमाणशिर प्रतिनिधीत्व देवुन नामनिर्देशनाव्दारे करणे बाबत...

संदर्भ :- महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण/ २०१०/प्र.क्र.८५/नवि-३२ मंत्रालय मुंबई दिनांक ६ जुलै २०१०.

सादर,

अहमदनगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक - २०१३ नंतर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३१ (अ) नुसार प्रमाणशिर प्रतिनिधीत्व देवुन समित्यांवर नामनिर्देशनाव्दारे नियुक्ती करणे बंधनकारक झालेले असल्याने समितीवर पालिका सदस्यांचे नामनिर्देशन करतांना मा.विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडेस संबंधित पक्षांची गटनोंदणी आवश्यक असल्याने निवडुन आलेल्या व गटनोंदणी झालेल्या पक्षनिहाय संख्याबलानुसार मा.महिला व बालकल्याण समिती सदस्यपदी नियुक्त करावयाचे सदस्यांबाबतचा तक्ता खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| अ) | एकुण सदस्य संख्या | - | ६८ |
| ब) | नियुक्त करावयाची सदस्य संख्या | - | १६ |

...२

**क) एकुण सदस्य संख्या ÷ नियुक्त सदस्य संख्या = प्रती सदस्य मुल्य.**

**६८ ÷ १६ = ४.२५**

| अ.नं. | पक्ष | संख्या बळ | सदस्य मुल्य | पक्ष निहाय सदस्य मुल्य | नियुक्त सदस्य संख्या | | पक्ष निहाय नियुक्त करावयाची सदस्य संख्या. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | प्रथम स्तर | व्दितीय स्तर | |
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** | **७** | **८** |
| १ | शहर विकास आघाडी | २२ | ÷ ४.२५ | ५.१७ | ५ | -- | ५ |
| २ | भारतीय कॉग्रेस | ११ | ÷ ४.२५ | २.५८ | २ | -- | २ |
| ३ | शिवसेना व अपक्ष विकास आघाडी | १८ | ÷ ४.२५ | ४.२३ | ४ | -- | ४ |
| ४ | भारतीय जनता पक्ष | ९ | ÷ ४.२५ | २.११ | २ | -- | २ |
| ५ | महाराष्ट्र नवनिर्माण सेना | ४ | ÷ ४.२५ | ०.९४ | -- | १ | १ |
| ६ | अपक्ष | १ | ÷ ४.२५ | ०.२३ | -- | -- | -- |
| ७ | अपक्ष | १ | ÷ ४.२५ | ०.२३ | -- | -- | -- |
| ८ | अपक्ष | १ | ÷ ४.२५ | ०.२३ | -- | -- | -- |
| ९ | अपक्ष | १ | ÷ ४.२५ | ०.२३ | -- | -- | -- |
| | **एकुण** | | | | **१३** | **१** | **१४** |

मा.आयुक्त सो यांचे मान्यतेने.

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**टिप्पणी.**

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.
नगरसचिव विभाग.-
दिनांक : ०७ /०२/२०१४.

विषय :-अहमदनगर महानगरपालिकेमध्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या) नियम २०१२ अन्वये प्रमाणशिर प्रतिनिधीत्व देवुन नामनिर्देशनाव्दारे नामनिर्देशित ५ (पाच) सदस्यांची नियुक्ती करणे बाबत...

सादर.

अहमदनगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक - २०१३ नंतर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या ) नियम २०१२ अन्वये प्रमाणशिर प्रतिनिधीत्व देवुन नामनिर्देशनाव्दारे नामनिर्देशित सदस्यांची नियुक्ती करणे बंधनकारक असल्याने नामनिर्देशित सदस्यांचे नामनिर्देशन करतांना मा.विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडेस संबंधित पक्षांची गटनोंदणी आवश्यक असल्याने निवडुन आलेल्या व गटनोंदणी झालेल्या पक्षनिहाय संख्याबलानुसार नामनिर्देशित सदस्यपदी नियुक्त करावयाचे सदस्यांबाबतचा तक्ता खालील प्रमाणे.

अ) एकुण सदस्य संख्या - ६८

ब) नियुक्त करावयाची सदस्य संख्या - ०५

**क) एकुण सदस्य संख्या ÷ नियुक्त सदस्य संख्या = प्रती सदस्य मुल्य.**

**६८ ÷ ०५ = १३.६**

| अ.नं. | पक्ष | संख्या सदस्य बळ | मुल्य | पक्ष निहाय सदस्य मुल्य | नियुक्त सदस्य संख्या | | पक्ष निहाय नियुक्त करावयाची सदस्य संख्या. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | प्रथम स्तर | व्दितीय स्तर | |
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** | **७** | **८** |
| १ | शहर विकास आघाडी | २२ | ÷ १३.६ | १.६१ | १ | १ | २ |
| २ | भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस | ११ | ÷ १३.६ | ०.८० | -- | १ | १ |
| ३ | शिवसेना व अपक्ष विकास आघाडी | १८ | ÷ १३.६ | १.३२ | १ | -- | १ |
| ४ | भारतीय जनता पक्ष | ९ | ÷ १३.६ | ०.६६ | -- | १ | १ |
| ५ | महाराष्ट्र नवनिर्माण सेना | ४ | ÷ १३.६ | ०.२९ | -- | -- | -- |
| ६ | अपक्ष | १ | ÷ १३.६ | ०.०७ | -- | -- | -- |
| ७ | अपक्ष | १ | ÷ १३.६ | ०.०७ | -- | -- | -- |
| ८ | अपक्ष | १ | ÷ १३.६ | ०.०७ | -- | -- | -- |
| ९ | अपक्ष | १ | ÷ १३.६ | ०.०७ | -- | -- | -- |
| | **एकुण** | | | | **२** | **३** | **५** |

आयुक्त,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : ४४** **दिनांक : १५/०२/२०१४.**

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेमध्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २० अन्वये मा.स्थायी समिती सदस्यपदी १६ सदस्यांची नेमणुक प्रमाणशिर प्रतिनिधीत्व देवुन नामनिर्देशनाव्दारे करणे बाबत...

-- ** --

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ :- महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण/ २०१०/प्र.क्र.८५/नवि-३२ मंत्रालय मुंबई दिनांक ६ जुलै २०१०.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २० अन्वये मा.स्थायी समिती सदस्यपदी एकुण १६ सदस्यांची नेमणुक करणे बाबत तरतुद आहे.

" **३१ अ. (१)** कोणत्याही समितीवरील पालिका सदस्यांची नियुक्ती ही त्याने धारण केलेल्या कोणत्याही पदाच्या आधारे असेल अशी ज्याबाबतीत या अधिनियमाव्दारे तरतूद करण्यांत आली असेल त्याव्यतिरीक्त एरव्ही, पुढील समित्यांच्या बाबतीत या अधिनियमात अथवा तद्न्वये केलेल्या नियमांत किंवा उपविधीमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, महानगरपालिकेव्दारे या समित्यांवर केली जाणारी पालिका सदस्यांची नियुक्ती ही, पोटकलम (२) च्या तरतुदींनुसार पालिका सदस्यांचे नामनिर्देशन करुन करण्यात येईल मग ही नियुक्ती नियमीत पदावरील असो किंवा नैमित्तीक रिक्त पदावरील असो

(अ) स्थायी समिती :

(ब) परिवहन समिती

(क) कलम ३० अन्वये नियुक्त केलेली कोणतीही विशेष समिती

(ड) कलम ३१ अन्वये नियुक्त केलेली कोणतीही तदर्थ समिती

**(२)** समितीवर पालिका सदस्यांचे नामनिर्देशन करतांना, महानगरपालिका, मान्यताप्राप्त पक्षांचे अथवा नोंदणीकृत पक्षांचे किंवा गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेईल आणि सभागृह नेता, विरोधी पक्ष नेता व अशा प्रत्येक पक्षाचा किंवा गटाचा नेता यांचेशी विचारविनिमय करुन शक्यतोवर, महानगरपालिकेतील अशा पक्षांच्या किंवा गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात सदस्यांचे नामनिर्देशन करील:

(परंतु मान्यतप्राप्त पक्ष किंवा नोंदणीकृत पक्ष किंवा गट किंवा आघाडी किंवा फ्रंट याचे तौलनिक संख्याबळ हे, प्रथमतः पालिका सदस्यांच्या एकुण संख्येला त्या समितीच्या सदस्यांच्या एकूण संख्याबळाने भागून परिगणित करण्यात येईल व तद्नंतर या भागाकाराच्या संख्येने मान्यताप्राप्त पक्ष किंवा नोंदणीकृत पक्ष किंवा गट किंवा आघाडी किंवा फ्रंट यांच्या पालिका सदस्यांच्या संख्येस भागण्यात येईल. अशा प्रकारे आलेली संख्या ही त्या त्या मान्यताप्राप्त पक्षांचे किंवा नोंदणीकृत पक्षांचे किंवा गटांचे किंवा आघाडीचे किंवा फ्रंटचे तौलनिक संख्याबळ असेल. अशाप्रकारे निश्चित केलेल्या तौलनिक संख्याबळाची संपूर्ण संख्या प्रथम विचारात घेउन, मान्यताप्राप्त पक्षांना किंवा नोंदणीकृत पक्षांना किंवा गटांना किंवा आघाडीला किंवा फ्रंटला जागा वाटून देण्यात येतील.अशा रितीने जागा वाटून दिल्यानंतर, एक किंवा अधिक जागा वाटून द्यावयाच्या राहून गेल्यास, त्या जागा, तौलनिक संख्याबळातील सर्वांत मोठया अपूर्णांक संख्येपासून सुरुवात करुन

तौलनिक संख्याबळातील अपूर्णांक संख्येच्या उतरत्या क्रमाने, त्या सर्व जागा वाटून दिल्या जाईपर्यंत, मान्यताप्राप्त पक्षांना किंवा नोंदणीकृत पक्षांना किंवा गटांना किंवा आघाडीला किंवा फ्रंटला प्रत्येकी **एक** याप्रमाणे वाटून देण्यांत येतील.)

परंतु आणखी असे की, महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता अधिनियम १९८६ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमान्वये मान्यताप्राप्त पक्ष किंवा नोंदणीकृत पक्ष वा गट यांचे तौलनिक संख्याबळ निश्चित करण्याच्या प्रयोजनाकरीता, निवडणूक निकालांच्या अधिसूचनेच्या दिनांकापासून एक महिन्याच्या कालावधीच्या आत मान्यताप्राप्त पक्ष किंवा नोंदणीकृत पक्ष वा गट अथवा कोणत्याही पक्षाचे किंवा गटाचे नसलेले निर्वाचित पालिका सदस्य यांना एकत्र घेवून आघाडी किंवा फ्रंट तयार करता येईल आणि अशा आघाडीची किंवा फ्रंटची नोंदणी झाल्यावर, अशा आघाडीच्या किंवा फ्रंटच्या सदस्यांना, उक्त अधिनियमाच्या तरतुदी, जणू काही ही आघाडी किंवा फ्रंट निवडणूकीपुर्वीच नोंदणीकृत असल्याप्रमाणे, लागू होतील.

**(३)** अशा पक्षाच्या किंवा गटाच्या वतीने नामनिर्देशित करावयाच्या पालिका सदस्यांच्या संख्येच्या बाबतीत कोणताही प्रश्न उद्‌भवल्यास, त्याबाबतीत, महानगरपालिकेचा निर्णय अंतिम असेल."

तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील वरील तरतुदींप्रमाणे स्थायी समितीवर १६ सदस्यांच्या नेमणुका करतांना संदर्भीय परिपत्रकातील कार्यपध्दतीनुसार करावयाच्या आहेत. ही कार्यपध्दती पुढील प्रमाणे आहे. **:-**

(१) विरोधी पक्ष नेत्यामार्फत किंवा गट नेत्यामार्फत स्थायी समितीवर अथवा इतर समित्यांवर तौलनिक संख्याबळाच्या आधारावर पालिका सदस्यांची नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी नावे पाठविताना ती बंद लखोटयात सभेच्या वेळी महापौरांकडे देण्यात यावीत. सभेच्या दिवसापूर्वी सदर नावे महापौरांना बंद लखोटयात द्यावयाची असतील तर त्या पत्राची एक प्रत बंद लखोटयातच आयुक्तांना सुध्दा देण्यात यावी.

(२) सदर बंद लखोटे सभेच्या वेळेस ते मूळच्याच अवस्थेत असून, ते पूर्वी उघडलेले नाहीत, याची उपस्थितांना खात्री करण्यासाठी बंद लखोटे सभेपुढे दाखविण्यात यावेत.

(३) सदर बंद लखोटे टेबलावर ठेवून ते महापौरांनी क्रमाने सर्वांच्या समोर उघडावेत व प्रत्येक लखोटा उघडल्यानंतर त्यातील नावे सभेत उपस्थित अन्य कोणत्याही व्यक्तीमार्फत सभेमध्ये वाचून दाखविण्यात यावीत.

(४) सभेत वाचण्यात आलेल्या नामनिर्देशित पालिका सदस्यांच्या नावांबद्दल ज्या गटनेत्याकडून ही नावे आली होती, त्यांचे काही आक्षेप नसल्यास, नामनिर्देशनाने निवडीबाबत पुढील कार्यवाही करण्यात यावी.

(५) याबाबत संबंधीतांचे आक्षेप असल्यास आयुक्तांकडे दिलेला दुसरा लखोटा उघडण्यात यावा व त्यातील आणि महापौरांकडील लखोटयातील नावे समान असल्याची खात्री करावी व तशी खात्री झाल्यास निवडीबाबत पुढील कार्यवाही करण्यात यावी. मात्र, नावे समान नसल्यास पूर्वी दिलेली लखोटयामधील नावे रद्द समजून नव्याने नामनिर्देशित करावयाची पालिका सदस्यांची नावे लेखी विरोधी पक्ष नेत्याकडून अथवा गट नेत्याकडून त्यांच्या स्वाक्षरीनिशी घेण्यात यावीत व त्या आधारे पुढील कार्यवाही करण्यात यावी.

(६) या संपूर्ण कामकाजाचे चित्रीकरण करण्यात यावे.

वरील तरतुदी प्रमाणे मा.विभागीय आयुक्त, नाशिक यांनी त्यांचे पत्र क्र.नपा-१/२/जा.क्र.३३५/१४ दिनांक १५-०१-२०१४ च्या आदेशान्वये शहरविकास आघाडी या २२ नगरसेवकांच्या गटांस मान्यता दिली असुन, गटनेते म्हणुन श्री.खान समद वहाब यांचे नांव नमुद केले आहे.

तसेच मा.विभागीय आयुक्त, नाशिक यांनी त्यांचे पत्र क्र.नपा-१/२/ जा.क्र. ३३२/१४ दिनांक १५-०१-२०१४ च्या आदेशान्वये भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस आघाडी या ११ नगरसेवकांच्या गटांस मान्यता दिली असुन, गटनेते म्हणुन श्री.संदीप भानुदास कोतकर यांचे नांव नमुद केले आहे.

तसेच शिवसेना व अपक्ष विकास आघाडी यांच्या १८ नगरसेवकांच्या गटनोंदणीसाठी मा.विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांनी त्यांचे पत्र क्र. नपा-१/२/जा.क्र.८१०/१३ दिनांक २३/०१/२०१४ अन्वये मान्यता दिली असुन, गटनेते म्हणुन श्री.शेंडगे संजय छगनराव यांचे नांव नमुद केले आहे.

तसेच भारतीय जनता पक्ष यांच्या ९ नगरसेवकांच्या गटनोंदणीसाठी मा.विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांनी त्यांचे पत्र क्र.नपा-१/२/जा.क्र.३३३/१४ दिनांक १५/०१/२०१४ अन्वये मान्यता दिली असुन, गटनेते म्हणुन श्री.दत्तात्रय हरीभाउ कावरे यांचे नांव नमुद केले आहे.

तसेच महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांच्या ४ नगरसेवकांच्या गटनोंदणीसाठी मा.विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांनी त्यांचे पत्र क्र.नपा-१/२/जा.क्र.३३४/१४ दिनांक १५/०१/२०१४ अन्वये मान्यता दिली असुन, गटनेते म्हणुन श्री.भोसले गणेश पुंडलिक यांचे नांव नमुद केले आहे.

उपरोक्त आदेशाप्रमाणे मा.स्थायी समितीच्या सदस्यपदी १६ सदस्यांची नियुक्ती करावयाची असल्याने पक्षनिहाय सदस्य नियुक्ती बाबतचा तक्ता खालील प्रमाणे.

अ) एकुण सदस्य संख्या - ६८

ब) नियुक्त करावयाची सदस्य संख्या - १६

**क) एकुण सदस्य संख्या ÷ नियुक्त सदस्य संख्या = प्रती सदस्य मुल्य.**

**६८ ÷ १६ = ४.२५**

| अ.नं. | पक्ष | संख्या बळ | सदस्य मुल्य | पक्ष निहाय सदस्य मुल्य | नियुक्त सदस्य संख्या | | पक्ष निहाय नियुक्त करावयाची सदस्य संख्या. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | प्रथम स्तर | व्दितीय स्तर | |
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** | **७** | **८** |
| १ | शहर विकास आघाडी | २२ ÷ | ४.२५ | ५.१७ | ५ | -- | ५ |
| २ | भारतीय कॉग्रेस | ११ ÷ | ४.२५ | २.५८ | २ | -- | २ |
| ३ | शिवसेना व अपक्ष विकास आघाडी | १८ ÷ | ४.२५ | ४.२३ | ४ | -- | ४ |
| ४ | भारतीय जनता पक्ष | ९ ÷ | ४.२५ | २.११ | २ | -- | २ |
| ५ | महाराष्ट्र नवनिर्माण सेना | ४ ÷ | ४.२५ | ०.९४ | -- | १ | १ |
| ६ | अपक्ष | १ ÷ | ४.२५ | ०.२३ | -- | -- | -- |
| ७ | अपक्ष | १ ÷ | ४.२५ | ०.२३ | -- | -- | -- |
| ८ | अपक्ष | १ ÷ | ४.२५ | ०.२३ | -- | -- | -- |
| ९ | अपक्ष | १ ÷ | ४.२५ | ०.२३ | -- | -- | -- |
| | एकुण | | | | १३ | १ | १४ |

उपरोक्त पक्षनिहाय संख्या बलाबाबत अवलोकन करता निदर्शनास येते की, अ.नं.१ ते ५ मध्ये दर्शविण्यांत आलेल्या पक्षांचे एकुण १४ सदस्य नामनिर्देशनाव्दारे नेमणुकी करीता उपलब्ध होवू शकतात परंतु स्थायी समिती मध्ये १६ सदस्यांची आवश्यकता आहे. तथापि अ.नं.६ ते ९ मध्ये दर्शविण्यात आलेले पक्ष यांची सदस्य संख्या सारखीच म्हणजे एक असल्याने त्यांचे पक्षनिहाय सदस्यमूल्य हेही एकसारखेच येत आहे. तसेच सदरील क्रमांकावर दर्शविलेले पक्ष नसुन एकल अपक्ष सदस्य आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३१ (३) चे अवलोकन करता " अशा पक्षाच्या किंवा गटाच्या वतीने नामनिर्देशित करावयाच्या पालिका सदस्यांच्या संख्येच्या बाबतीत कोणताही प्रश्न उद्‌भवल्यास, त्याबाबतीत, महानगरपालिकेचा निर्णय अंतिम असेल. " असे निदर्शनास येते.

सबब उपरोक्त नमुद करणेंत आले प्रमाणे अ.नं.६ ते ९ मधील सदस्यमूल्य एकसारखेच येत असल्याने दोन सदस्य निवडीकामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३१ (३) चा विचार करता, २ (दोन) सदस्यांची नेमणुक महानगरपालिका सभेच्या निर्णयाव्दारे करणे उचित वाटते.

तरी उपरोक्त अ.नं. १ ते ५ प्रमाणे सदस्यांची नेमणुक प्रमाणशिर प्रतिनिधीत्व देवून नामनिर्देशनाव्दारे करणे व अ.नं. ६ ते ९ मध्ये दर्शविण्यांत आलेली पक्षनिहाय स्थिती पाहता २(दोन) सदस्याची नियुक्ती महानगरपालिका सभेच्या निर्णयाव्दारे करणे ही बाब धोरणात्मक स्वरुपाची असल्यामुळे मा.महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा बोलाविणे आवश्यक आहे.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, प्रस्तावित केलेनुसार मान्य.

यावर मा.महापौर साहेब यांचा अभिप्राय की, निर्णयास्तव मा.महासभेपुढे ठेवा.

अशा बाबतचा प्रस्ताव मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब यांचे अभिप्रायासह मा.महासभेपुढे ठेविला.

**चर्चा :-**

**मा.महापौर तथा पिठासीन अधिकारी :-** प्रस्ताव क्रमांक ४४ चे वाचन करण्यांत यावे.

मा.महापौर साहेब यांचे सुचनेनुसार प्रस्ताव क्रमांक ४४ चे वाचन करण्यांत आले.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** या ठिकाणी प्रथम सभा येत असल्यामुळे सर्वप्रथम नविन महापौर त्याचप्रमाणे मा.उपमहापौर, सर्व नगरसेवक नगरसेविका मा.आयुक्त, मा.उपायुक्त, नगरसचिव, पत्रकार, छायाचित्रकार, कर्मचारी बंधुंनो सर्वांचे स्वागत. सभागृहामध्ये याआधी कोणत्या चार सभा झाल्या. आजची पाचवी सभा आहे कायद्यानुसार महापौरांची ही पहिली सभा आहे. मग चार सभा कोणत्या झाल्या.

**मा.महापौर तथा पिठासीन अधिकारी :-** नगरसचिव उत्तर देतील.

**नगरसचिव :-** महानगरपालिकेच्या आर्थिक वर्षानुसार नोंद ठेवली जाते. कायद्याच्या दृष्टीने ही पहिली सभा आहे.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** आर्थिक वर्ष कोणते त्याबाबत माहिती द्या.

**नगरसचिव :-** १ एप्रिल २०१३ ते ३१ मार्च २०१४ अखेर असे आर्थिक वर्ष आहे.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** सभागृहाची दिशाभुल करु नका. २०१४ चे प्रोसिडींग येथुनपुढे मोजले जाणार आहे. म्हणुन ही सभा क्रमांक १ आहे. नगरसचिव यांचेवतीने ज्यांनी वाचन केले त्याला काय संबोधावयाचे.

**नगरसचिव :-** नगरसचिव यांचे वतीने असे संबोधवावे.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** तुम्ही जे आत्ता विषयाचे वाचन केले त्यापैकी आमच्या हातात काहीच नाही. आपणांकडील टिपणीचे वाचन केले आहे. नगरसेवकांना याबाबत काहीच माहिती नाही. ६८ नगरसेवकांपैकी ही माहिती आमच्याकडे नाही याचा खुलासा करावा.

**नगरसचिव :-** सदस्यांना अजेंडयाबरोबर टिपणी पाठविण्यात येते.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** आता जी टिपणी वाचून दाखविली ती टिपणी विचारात घ्यावयाची की ६८ नगरसेवकांना सभेच्या विषय पत्रिकेबरोबर पाठविलेल्या टिपणीतील नियुक्त करावयाच्या सदस्याचे माहितीही तुलनात्मक तक्त्यात दाखविलेली संख्या विचारात घ्यावयाची का आता वाचुन दाखविलेली टिपणीतील संख्या याबाबत खुलासा करावा.

**मा. महापौर तथा पिठासीन अधिकारी :-** नगरसचिव , मा. आयुक्त साहेब यांचे दालनातील गटनेता यांचे बैठकीबाबत सविस्तर माहिती दया.

**नगरसचिव :-** मा. सदस्य यांना पाठविलेली मा.स्थायी समिती व मा.महिला व बालकल्याण समिती या बाबतची टिपणी मा. आयुक्त यांचेकडुन मान्य करून देण्यात आलेली आहे, ती पाठविण्यात आली आहे, त्यात बदल नाही. तसेच नामनिर्देशित सदस्य यांचे बाबतची बदललेली टिपणी संबंधीत गट नेत्यांना पाठविलेली आहे.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** मा. आयुक्त यांच्या दालनातील बैठकीची टिपणी ही सदस्यांना पाठविलेली नाही हे मान्य करा मा. शासनाच्या २०१२च्या परिपत्रकामध्ये काय सांगीतले आहे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५ काय सांगतो ते वाचुन दाखविले.

मा. शासन निर्णय दि.२८ जुलै २०१२ व महानगरपालिका अधिनियम पुस्तकातील पा.नं. ७०२ लिहीले आहे ते वाचून दाखविले या सभेचाअजेंडा ७ तारखेला पाठविण्यात आला व १२ तारखेला मा. आयुक्त साहेब यांचे दालनात मिटींग घेता व त्यामध्ये तुम्हाला सदस्यांना पाठविलेल्या टिपणीतील सदस्य निवडीबाबतचा तक्ता बदलण्याचा अधिकार नाही तुम्हाला अधिकार असेल तर तसे सांगा तरतुदीनुसार सदस्यांचे निवडीसाठी अगोदर नावे मागवावयास पाहिजे होते व त्यानंतर सभेचा अजेंडा काढणे आवश्यक होते. आम्हाला पाठविलेल्या टिपणीनुसार एकूण सदस्य संख्येपैकी ५ ती मुल्य सदस्य संख्येनुसार महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला १ सदस्य संख्या दर्शविली आहे. परंतु त्यानुसार महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला १ सदस्य संख्या जात नाही. रेक्टीफाय केलेले तक्त्याचे शुध्दीपत्रक आम्हाला दिलेले नाही.

**मा.श्री. बाळासाहेब बोराटे :-** गटनेत्यांनी जे पत्र दिले आहे. त्यानुसार संबंधितांनी नगरसेवकांना माहिती दिलेली असेलच.

**मा.श्री. शेख नजीर :-** आता अजेंडयावरील विषय घेण्यात यावे.

**मा. महापौर तथा पिठासीन अधिकारी :-** अहमदनगर महानगरपालिकेमध्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २० अन्वये मा.स्थायी समिती सदस्यपदी १६ सदस्याची नियुक्ती करणेकामी प्रत्येक गटनेता अथवा त्यांचे प्रतिनिधी असतील त्यांनी बंद पाकीटातील नावे इथे सादर करावे. प्रथम स्थायी समिती सदस्याकरिता नावे दहा मिनीटात आणून देण्यात यावी.

यावेळेत मा.गणेश भोसले-मनसे, मा.सुनिलकुमार कोतकर- राष्ट्रीय कॉंग्रेस , मा. खान समद वहाब- शहर विकास आघाडी, मा. दत्ता कावरे- भाजपा व मा. संजय शेंडगे- शिवसेना इ. यांनी पिठासीन अधिकारी यांचेकडे पाकिटे सादर केली.

**मा.श्री. किशोर डागवाले :-** यापुढे सभेची वेळ ११ वा. ठेवण्यात यावी.

**मा.श्री. शेख नजीर अहमद :-** शुक्रवारी मिटींग घेण्यात येवु नये .

**मा. श्री. अनिल शिंदे :-** महिला सदस्य जास्त असल्याने चतुर्थीच्या दिवशी मिटींग ठेवू नये.

**मा. महापौर तथा पिठासीन अधिकारी :-** स्थायी समिती सदस्य नामनिर्देशन दाखल करण्यासाठी देण्यात आलेली १० मिनीटाची वेळ संपलेली आहे.

दाखल पाकिटे सर्व समक्ष सभागृहास दाखविण्यात आली.

**मा.महापौर तथा पिठासीन अधिकारी :-** सर्व गटनेते व त्याचे प्रतिनिधी यांनी दाखल केलेली पाकिटे उघडली असुन नगरसचिव प्राप्त नावे वाचून दाखवा.

**नगरसचिव :-** नामनिर्देशाव्दारे मा.स्थायी समितीवर निवड करावयाची नावे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे गटनेते श्री.गणेश पुंडलिक भोसले यांनी पत्राव्दारे दाखल केली आहे. यामध्ये

**१) मा.श्री.किशोर आसाराम डागवाले,**

भारतीय जनता पक्षाचे गटनेते श्री.दत्तात्रय हरीभाउ कावरे यांनी सुचविलेली नांवे

**१) सौ.साठे नंदा मनेष,**

**२) श्री.कावरे दत्तात्रय हरीभाउ,**

शिवसेना अपक्ष विकास आघाडीचे गटनेता श्री.संजय छगनराव शेंडगे यांनी सुचविलेली नांवे

**१) मा.सौ.सुनिता दत्तात्रय मुदगल,**

**२) मा.सौ.शारदा दिगंबर ढवण,**

**३) मा.श्री.उमेश खंडेराव कवडे,**

**४) मा.श्री.सचिन तुकाराम जाधव,**

भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसचे गटनेता मा.श्री.संदीप भानुदास कोतकर यांनी प्रतिनिधी मा.श्री.सुनिल सर्जेराव कोतकर यांचेमार्फत दिलेली नांवे

**१) मा.श्री.शेख फैयाज अजिजोद्दीन,**

**२) मा.सौ.सुनिता महेंद्र कांबळे,**

नॅशनॅलिस्ट कॉंग्रेस पार्टी व अपक्ष नगरसेवक यांची शहर विकास आघाडी गटनेता मा.श्री.खान समद वहाब यांचेकडुन प्राप्त नांवे

**१) मा.श्री.संपत विजय बारस्कर,**

**२) मा.सौ.विजया अजय दिघे,**

**३) मा.श्री.अजिंक्य सुधाकर बोरकर,**

**४) मा.श्री.बाळासाहेब मारुतीराव बोराटे,**

**५) मा.श्री.कुमार बबनराव वाकळे,**

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** अनुक्रमांक १५ चे नांव मी मा.सौ.उषा शरद ठाणगे यांचे सुचवितो.

**मा.श्री.समद खान :-** मा.श्री.बाळासाहेब बोराटे यांनी सुचविलेल्या नावास मी अनुमोदन देतो.

**मा.श्री.सुनिल कोतकर :-** अनुक्रमांक १६ चे नांव मा.श्री.दिप नारायण चव्हाण यांचे सुचवितो.

**मा.श्री.मुदस्सर शेख :-** मा.श्री.सुनिल कोतकर यांनी सुचविलेल्या नावास मी अनुमोदन देतो.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** मा.स्थायी समिती व मा.महिला व बालकल्याण समितीचा प्रस्ताव सारखाच असलेने मा.स्थायी समितीच्या निवड पध्दतीनेच मा.महिला व बालकल्याण समिती निवडीची प्रक्रीया करण्यांत यावी.

---*---

**ठराव :-**

ठरविण्यांत येते की, सर्व पक्षाच्या मा.गटनेत्यांनी सुचविलेल्या १४ मा.स्थायी समिती सदस्यांचे नावास व मा.श्री.बाळासाहेब बोराटे, सदस्य, अहमदनगर महानगरपालिका यांनी मा.स्थायी समिती सदस्यपदी १५ नंबरचे सुचविलेल्या मा.सौ.उषा शरद ठाणगे यांचे नावास तसेंच मा.श्री.सुनिल कोतकर यांनी मा.स्थायी समिती सदस्यपदी १६ नंबरच्या सुचविलेल्या मा.श्री.दिप नारायण चव्हाण यांचे नावास मान्यता देण्यांत येत आहे.

प्राप्त नामनिर्देशनापैकी खालील प्रमाणे सदस्य, **मा.स्थायी समिती सदस्य पदी** विधीग्राहयरित्या नामनिर्देशित झाल्याचे मी घोषित करीत आहे.

| अ.नं. | सदस्यांचे नांव | पक्ष |
|---|---|---|
| १ | मा.श्री.संपत विजय बारस्कर | नॅशनॅलिस्ट कॉग्रेस पार्टी व अपक्ष नगरसेवक यांची शहर विकास आघाडी |
| २ | मा.सौ.विजया अजय दिघे | नॅशनॅलिस्ट कॉग्रेस पार्टी व अपक्ष नगरसेवक यांची शहर विकास आघाडी |
| ३ | मा.श्री.अजिंक्य सुधाकर बोरकर | नॅशनॅलिस्ट कॉग्रेस पार्टी व अपक्ष नगरसेवक यांची शहर विकास आघाडी |
| ४ | मा.श्री.बाळासाहेब मारुतीराव बोराटे | नॅशनॅलिस्ट कॉग्रेस पार्टी व अपक्ष नगरसेवक यांची शहर विकास आघाडी |
| ५ | मा.श्री.कुमार बबनराव वाकळे | नॅशनॅलिस्ट कॉग्रेस पार्टी व अपक्ष नगरसेवक यांची शहर विकास आघाडी |
| ६ | मा.श्री.शेख फैयाज अजिजोद्दीन | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस |
| ७ | मा.सौ.सुनिता महेंद्र कांबळे | भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस |
| ८ | मा.सौ.सुनिता दत्तात्रय मुदगल | शिवसेना अपक्ष विकास आघाडी |
| ९ | मा.सौ.शारदा दिगंबर ढवण | शिवसेना अपक्ष विकास आघाडी |
| १० | मा.श्री.उमेश खंडेराव कवडे | शिवसेना अपक्ष विकास आघाडी |
| ११ | मा.श्री.सचिन तुकाराम जाधव | शिवसेना अपक्ष विकास आघाडी |
| १२ | मा.सौ.नंदा मनेष साठे | भारतीय जनता पक्ष |
| १३ | मा.श्री.दत्तात्रय हरीभाउ कावरे | भारतीय जनता पक्ष |
| १४ | मा.श्री.किशोर आसाराम डागवाले | महाराष्ट्र नवनिर्माण सेना |
| १५ | मा.सौ.उषा शरद ठाणगे | मा.महासभेकडुन नियुक्ती |
| १६ | मा.श्री.दिप नारायण चव्हाण | मा.महासभेकडुन नियुक्ती |

सुचक : मा.श्री.बाळासाहेब मारुती बोराटे,

अनुमोदक : मा.श्री.सुनिल सर्जेराव कोतकर,

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-

महापौर तथा पिठासीन अधिकारी,
अहमदनगर महानगरपालिका.

## अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

**प्रस्ताव क्रमांक : ४५** **दिनांक : १५/०२/२०१४.**

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेमध्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० अन्वये विशेष समिती अंतर्गत महिला व बालकल्याण समितीच्या सदस्यपदी १६ सदस्यांची नियुक्ती प्रमाणशिर प्रतिनिधीत्व देवुन नामनिर्देशनाव्दारे करणे बाबत...

-- ** --

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ :- महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण/ २०१०/प्र.क्र.८५/नवि-३२ मंत्रालय मुंबई दिनांक ६ जुलै २०१०.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० अन्वये महानगरपालिकेस विषेश समित्या नेमण्याची तरतुद आहे.

१) कलम ३० (१) नुसार महानगरपालिकेस वेळोवेळी आपल्या पालिका सदस्यांमधून महिला व बालकल्याण समितीसह विशेष समित्यांची नेमणूक करता येईल. अशा समित्यांनी महानगरपालिका त्यांना वेळोवळी जे अनुदेश देईल ते पाळले पाहिजेत. व कलम (१-अ) महिला व बालकल्याण समितीवरील सदस्यांपैकी किमान पंच्याहत्तर टक्के सदस्य हे, महिला पालिका सदस्यांमधील असतीलः

२) महानगरपालिकेस, तिच्या सभेत उपस्थित असलेल्या व मत देणा-या पालिका सदस्यांपैकी कमीत कमी दोन तृतीयांश पालिका सदस्यांनी मत देवून पारित केलेल्या विशिष्ट ठरावाव्दारे प्रत्येक विशेष समितीच्या कामकाजाचे क्षेत्र निश्चित करता येईल आणि अशा कोणत्याही क्षेत्रात समाविष्ट केलेल्या सर्व बाबी व प्रश्न प्रथमतः समुचित समितीपुढे ठेवले पाहिजेत व ते अशा समितीच्या शिफारशींसह महानगरपालिकेस सादर केले पाहिजेत असा निदेश देता येईल, तसेच महानगरपालिकेस, तशाच ठरावाव्दारे आपले अधिकार व कर्तव्ये यापैकी कोणतेही अधिकार व कर्तव्ये विनिर्दिष्ट केलेल्या विशेष समित्यांकडे प्रत्यायोजित करता येतील.

३) प्रत्येक विशेष समितीने आपल्या सदस्यांपैकी दोन सदस्यांची सभापती व उपसभापती म्हणून नेमणूक केली पाहिजे : परंतु कोणत्याही पालिका सदस्यास एकाच वेळी एकापेक्षा अधिक विशेष समित्यांचा सभापती होता येणार नाही.

(परंतु आणखी असे की, महिला व बालकल्याण समितीवरील अध्यक्ष (सभापती) व उपाध्यक्ष (उपसभापती) या तिच्या महिला पालिका सदस्यांमधील असतील.)

४) सभापती व त्याच्या अनुपस्थितीत उपसभापती आणि या दोघांच्या अनुपस्थितीत, विशेष समितीचे जे सदस्य सभेत उपस्थित असतील त्यांनी निवडलेला अन्य सदस्य सभेच्या वेळी अध्यक्ष म्हणून काम चालवील.

५) विशेष समितीचा जो कोणताही सदस्य तात्पुरता आजार किंवा अशा समितीने मान्य केलेले कोणतेही अन्य कारण याव्यतिरिक्त अन्य कारणामुळे लागोपाठ दोन महिन्यांच्या मुदतीत अशा समितीच्या सभांना स्वतः अनुपस्थित राहील किंवा कोणत्याही कारणामुळे -मग ते अशा समितीने मान्य केलेले असो वा नसो- लागोपाठ चार महिन्यांच्या मुदतीत अशा समितीच्या सभांना स्वतः अनुपस्थित राहील किंवा उपस्थित राहण्यास असमर्थ होईल तो अशा समितीचा सदस्य असण्याचे बंद होईल व त्यानंतर त्याची जागा रिकामी होईल.

६) प्रत्येक विशेष समितीचे सर्व कामकाज महानगरपालिकेकडून कायम केले जाण्याच्या अधीन असेल :

परंतु पोट-कलम (२) अन्वये आपले अधिकार व कर्तव्ये यापैकी कोणतेही अधिकार किंवा कर्तव्ये विशेष समित्यांकडे सोपवताना महानगरपालिकेने अशा समितीचा निर्णय अंतिम असेल असा निदेश दिला असेल तर, अशा समितीच्या कामकाजापैकी असे अधिकार व कर्तव्ये या संबंधीचे कामकाज महानगरपालिकेकडून कायम केले जाण्याच्या अधीन राहणार नाही. मात्र अशा निर्णयास अशा समितीच्या एकूण सदस्यांपैकी निदान दोन तृतीयांश सदस्यांनी पाठिंबा दिलेला असला पाहिजे :

आणखी असे की, कोणत्याही विशेष समितीस आपल्या निर्णयानुसार उपाययोजना करण्यास विलंब झाल्यास त्यामुळे अत्यंत गैरसोय होईल असे वाटत असेल तर, तिला आपले कामकाज महानगरपालिकेकडून कायम केले जाणे आवश्यक असेल अशा बाबतीत, अशा कायम करण्याची वाट न पाहता अशी उपाययोजना करण्यात यावी, असा निदेश, एकुण सदस्यांपैकी निम्म्या सदस्यांनी पाठिंबा दिलेल्या ठरावाव्दारे देता येईल, परंतु महानगरपालिकेने अशा समितीचे कामकाज नंतर कायम केले नाही तर, महानगरपालिकेचे आदेश अंमलात आणण्यासाठी त्यावेळी व्यवहार्य असतील अशा उपाययोजना विलंब न लावता करण्यात आल्या पाहिजेत.

७) महानगरपालिकेस कोणत्याही वेळी विशेष समितीचे विसर्जन करता येईल किंवा तिच्या रचनेत फेरफार करता येईल.

८) विशेष समित्यांची रचना व अशा समित्यांच्या सभांत कामकाज चालवणे, कामकाजाच्या टिप्पण्या ठेवणे व प्रतिवृत्त सादर करणे व अशा समित्यांपुढील अन्य बाबी यांचे नियमन नियमांव्दारे करता येईल.

तसेच या समितीवर प्रमाणशिर प्रतिनिधीत्व देवुन नामनिर्देशनाव्दारे नेमणुक करणेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये पुढील तरतुद आहे. " **कलम ३१-अ (१)** कोणत्याही समितीवरील पालिका सदस्यांची नियुक्ती ही त्याने धारण केलेल्या कोणत्याही पदाच्या आधारे असेल अशी ज्याबाबतीत या अधिनियमाव्दारे तरतूद करण्यांत आली असेल त्याव्यतिरीक्त एरव्ही, पुढील समित्यांच्या बाबतीत या अधिनियमात अथवा तद्नंतर केलेल्या नियमांत किंवा उपविधीमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, महानगरपालिकेव्दारे या समित्यांवर केली जाणारी पालिका सदस्यांची नियुक्ती ही, पोटकलम (२) च्या तरतुदीं अनुसार पालिका सदस्यांचे नामनिर्देशन करुन करण्यात येईल मग ही नियुक्ती नियमीत पदावरील असो किंवा नैमित्तीक रिक्त पदावरील असो :-

(क) स्थायी समिती :
(ख) परिवहन समिती
(ग) कलम ३० अन्वये नियुक्त केलेली कोणतीही विशेष समिती
(घ) कलम ३१ अन्वये नियुक्त केलेली कोणतीही तदर्थ समिती

**(२)** समितीवर पालिका सदस्यांचे नामनिर्देशन करतांना, महानगरपालिका, मान्यताप्राप्त पक्षांचे अथवा नोंदणीकृत पक्षांचे किंवा गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेईल आणि सभागृह नेता, विरोधी पक्ष नेता व अशा प्रत्येक पक्षाचा किंवा गटाचा नेता यांचेशी विचारविनिमय करुन शक्यतोवर, महानगरपालिकेतील अशा पक्षांच्या किंवा गटांच्या किंवा गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात सदस्यांचे नामनिर्देशन करील :

(परंतु मान्यतप्राप्त पक्ष किंवा नोंदणीकृत पक्ष किंवा गट किंवा आघाडी किंवा फ्रंट याचे तौलनिक संख्याबळ हे, प्रथमतः पालिका सदस्यांच्या एकुण संख्येला त्या समितीच्या सदस्यांच्या एकूण संख्याबळाने भागून परिगणित करण्यात येईल व तद्नंतर या भागाकाराच्या संख्येने मान्यताप्राप्त पक्ष किंवा नोंदणीकृत पक्ष किंवा गट किंवा आघाडी किंवा फ्रंट यांच्या पालिका सदस्यांच्या संख्येस भागण्यात येईल. अशा प्रकारे आलेली संख्या ही त्या त्या मान्यताप्राप्त पक्षांचे किंवा नोंदणीकृत पक्षांचे किंवा गटांचे किंवा आघाडीचे किंवा फ्रंटचे तौलनिक संख्याबळ असेल. अशाप्रकारे निश्चित केलेल्या तौलनिक संख्याबळाची संपूर्ण संख्या प्रथम विचारात घेउन, मान्यताप्राप्त पक्षांना किंवा नोंदणीकृत पक्षांना किंवा गटांना किंवा आघाडीला किंवा फ्रंटला जागा वाटून देण्यात येतील.अशा रितीने जागा वाटून दिल्यानंतर, एक किंवा अधिक जागा वाटून द्यावयाच्या राहून गेल्यास, त्या जागा, तौलनिक संख्याबळातील सर्वांत मोठया अपूर्णांक संख्येपासून सुरुवात करुन तौलनिक संख्याबळातील अपूर्णांक संख्येच्या उतरत्या क्रमाने, त्या सर्व जागा वाटून दिल्या जाईपर्यंत, मान्यताप्राप्त पक्षांना किंवा नोंदणीकृत पक्षांना किंवा गटांना किंवा आघाडीला किंवा फ्रंटला प्रत्येकी एक याप्रमाणे वाटून देण्यांत येतील.)

परंतु आणखी असे की, महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता अधिनियम १९८६ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमान्वये मान्यताप्राप्त पक्ष किंवा नोंदणीकृत पक्ष वा गट यांचे तौलनिक संख्याबळ निश्चित करण्याच्या प्रयोजनाकरीता, निवडणूक निकालांच्या अधिसूचनेच्या दिनांकापासून एक महिन्याच्या कालावधीच्या आत मान्यताप्राप्त पक्ष किंवा नोंदणीकृत पक्ष वा गट अथवा कोणत्याही पक्षाचे किंवा गटाचे नसलेले निर्वाचित पालिका सदस्य यांना एकत्र घेवून आघाडी किंवा फ्रंट तयार करता येईल आणि अशा आघाडीची किंवा फ्रंटची नोंदणी झाल्यावर, अशा आघाडीच्या किंवा फ्रंटच्या सदस्यांना, उक्त अधिनियमाच्या तरतुदी, जणू काही ही आघाडी किंवा फ्रंट निवडणूकीपुर्वीच नोंदणीकृत असल्याप्रमाणे, लागू होतील.

**(३)** अशा पक्षाच्या किंवा गटाच्या वतीने नामनिर्देशित करावयाच्या पालिका सदस्यांच्या संख्येच्या बाबतीत कोणताही प्रश्न उद्भवल्यास, त्याबाबतीत, महानगरपालिकेचा निर्णय अंतिम असेल."

तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील वरील तरतुदींप्रमाणे महिला व बाल कल्याण समितीवर १६ सदस्यांच्या नेमणुका करतांना संदर्भीय परिपत्रकातील कार्यपध्दतीनुसार करावयाच्या आहेत. ही कार्यपध्दती पुढील प्रमाणे आहे. **:-**

(१) विरोधी पक्ष नेत्यामार्फत किंवा गट नेत्यामार्फत स्थायी समितीवर अथवा इतर समित्यांवर तौलनिक संख्याबळाच्या आधारावर पालिका सदस्यांची नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी नावे पाठविताना ती बंद लखोटयात सभेच्या वेळी महापौरांकडे देण्यात यावीत. सभेच्या दिवसापूर्वी सदर नावे महापौरांना बंद लखोटयात द्यावयाची असतील तर त्या पत्राची एक प्रत बंद लखोटयातच आयुक्तांना सुध्दा देण्यात यावी.

(२) सदर बंद लखोटे सभेच्या वेळेस ते मूळच्याच अवस्थेत असून, ते पूर्वी उघडलेले नाहीत, याची उपस्थितांना खात्री करण्यासाठी बंद लखोटे सभेपुढे दाखविण्यात यावेत.

(३) सदर बंद लखोटे टेबलावर ठेवून ते महापौरांनी क्रमाने सर्वांच्या समोर उघडावेत व प्रत्येक लखोटा उघडल्यानंतर त्यातील नावे सभेत उपस्थित अन्य कोणत्याही व्यक्तीमार्फत सभेमध्ये वाचून दाखविण्यात यावीत.

(४) सभेत वाचण्यात आलेल्या नामनिर्देशित पालिका सदस्यांच्या नावांबद्दल ज्या गटनेत्याकडून ही नावे आली होती, त्यांचे काही आक्षेप नसल्यास, नामनिर्देशनाने निवडीबाबत पुढील कार्यवाही करण्यात यावी.

(५) याबाबत संबंधीतांचे आक्षेप असल्यास आयुक्तांकडे दिलेला दुसरा लखोटा उघडण्यात यावा व त्यातील आणि महापौरांकडील लखोटयातील नावे समान असल्याची खात्री करावी व तशी खात्री झाल्यास निवडीबाबत पुढील कार्यवाही करण्यात यावी. मात्र, नावे समान नसल्यास पूर्वी दिलेली लखोटयामधील नावे रद्द समजून नव्याने नामनिर्देशित करावयाची पालिका सदस्यांची नावे लेखी विरोधी पक्ष नेत्याकडून अथवा गट नेत्याकडून त्यांच्या स्वाक्षरीनिशी घेण्यात यावीत व त्या आधारे पुढील कार्यवाही करण्यात यावी.

(६) या संपूर्ण कामकाजाचे चित्रीकरण करण्यात यावे.

वरील तरतुदी प्रमाणे मा.विभागीय आयुक्त, नाशिक यांनी त्यांचे पत्र क्र.नपा-१/ २/जा.क्र.३३५/१४ दिनांक १५-०१-२०१४ च्या आदेशान्वये शहरविकास आघाडी या २२ नगरसेवकांच्या गटांस मान्यता दिली असुन, गटनेते म्हणुन श्री.खान समद वहाब यांचे नांव नमुद केले आहे.

तसेच मा.विभागीय आयुक्त, नाशिक यांनी त्यांचे पत्र क्र.नपा-१/२/ जा.क्र. ३३२/१४ दिनांक १५-०१-२०१४ च्या आदेशान्वये भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस आघाडी या ११ नगरसेवकांच्या गटांस मान्यता दिली असुन, गटनेते म्हणुन श्री.संदीप भानुदास कोतकर यांचे नांव नमुद केले आहे.

तसेच शिवसेना यांच्या १८ नगरसेवकांच्या गटनोंदणीसाठी मा.विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचे पत्र क्र.नपा-१/२/जा.क्र.८१०/१३ दिनांक २३/०१/२०१४ अन्वये मान्यता दिली असुन, गटनेते म्हणुन श्री.शेंडगे संजय छगनराव यांचे नांव नमुद केले आहे.

तसेच भारतीय जनता पक्ष यांच्या ९ नगरसेवकांच्या गटनोंदणीसाठी मा.विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचे पत्र क्र.नपा-१/२/जा.क्र.३३३/१४ दिनांक १५/०१/२०१४ अन्वये मान्यता दिली असुन, गटनेते म्हणुन श्री.दत्तात्रय हरीभाउ कावरे यांचे नांव नमुद केले आहे.

तसेच महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांच्या ४ नगरसेवकांच्या गटनोंदणीसाठी मा.विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचे पत्र क्र.नपा-१/२/जा.क्र.३३४/१४ दिनांक १५/०१/२०१४ अन्वये मान्यता दिली असुन, गटनेते म्हणुन श्री.भोसले गणेश पुंडलिक यांचे नांव नमुद केले आहे. राजपत्रामध्ये प्रसिध्दी झाल्याप्रमाणे परिस्थिती विचारात घ्यावी लागेल.

महानगरपालिका सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक १ दिनांक २८/०१/२००५ नुसार महिला व बाल कल्याण समितीची सदस्य संख्या १६ निश्चीत करण्यात आली आहे. व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० (१ अ) अन्वये समिती सदस्यांपैकी किमान ७५ % सदस्य हे महिला पालिका सदस्यामधील असतील असे असले तरी उपरोक्त सभेत समितीवर १०० % महिला सदस्य असाव्यात असे तत्कालीन सदस्यांनी सुचविलेले होते व त्याप्रमाणे पिठासीन अधिकारी यांनी सर्व सदस्याच्या एकमताने महिला बाल कल्याण समितीसाठी १६ सदस्य संख्या निश्चीत केली आहे. त्याप्रमाणे आजही विचार करावयाचा झाल्यास उपरोक्त आदेशाप्रमाणे मा.महिला व बालकल्याण समितीच्या सदस्यपदी १६ सदस्यांची नियुक्ती करावयाची झाल्यास पक्षनिहाय सदस्य नियुक्ती बाबतचा तक्ता खालील प्रमाणे.

अ) एकुण सदस्य संख्या - ६८

ब) नियुक्त करावयाची सदस्य संख्या - १६

**क) एकुण सदस्य संख्या ÷ नियुक्त सदस्य संख्या = प्रती सदस्य मुल्य.**

**६८ ÷ १६ = ४.२५**

| अ.नं. | पक्ष | संख्या बळ | सदस्य मुल्य | पक्ष निहाय सदस्य मुल्य | नियुक्त सदस्य संख्या | | पक्ष निहाय नियुक्त करावयाची सदस्य संख्या. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | प्रथम स्तर | व्दितीय स्तर | |
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** | **७** | **८** |
| १ | शहर विकास आघाडी | २२ | ÷ ४.२५ | ५.१७ | ५ | -- | ५ |
| २ | भारतीय कॉग्रेस | ११ | ÷ ४.२५ | २.५८ | २ | -- | २ |
| ३ | शिवसेना व अपक्ष विकास आघाडी | १८ | ÷ ४.२५ | ४.२३ | ४ | -- | ४ |

| अ.नं. | पक्ष | संख्या सदस्य बळ मुल्य | पक्ष निहाय सदस्य मुल्य | नियुक्त सदस्य संख्या प्रथम स्तर | नियुक्त सदस्य संख्या व्दितीय स्तर | पक्ष निहाय नियुक्त करावयाची सदस्य संख्या. |
|---|---|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३ ४** | **५** | **६** | **७** | **८** |
| ४ | भारतीय जनता पक्ष | ९ ÷ ४.२५ | २.११ | २ | -- | २ |
| ५ | महाराष्ट्र नवनिर्माण सेना | ४ ÷ ४.२५ | ०.९४ | -- | १ | १ |
| ६ | अपक्ष | १ ÷ ४.२५ | ०.२३ | -- | -- | -- |
| ७ | अपक्ष | १ ÷ ४.२५ | ०.२३ | -- | -- | -- |
| ८ | अपक्ष | १ ÷ ४.२५ | ०.२३ | -- | -- | -- |
| ९ | अपक्ष | १ ÷ ४.२५ | ०.२३ | -- | -- | -- |
| | **एकुण** | | | **१३** | **१** | **१४** |

उपरोक्त पक्षनिहाय संख्या बलाबाबत अवलोकन करता निदर्शनास येते की, अ.नं.१ ते ५ मध्ये दर्शविण्यांत आलेल्या पक्षांचे एकुण १४ सदस्य नामनिर्देशनाव्दारे नेमणुकी करीता उपलब्ध होवू शकतात परंतु महिला व बाल कल्याण समितीमध्ये १६ सदस्यांची आवश्यकता आहे. तथापि अ.नं.६ ते ९ मध्ये दर्शविण्यात आलेले पक्ष यांची सदस्य संख्या सारखीच म्हणजे एक असल्याने त्यांचे पक्षनिहाय सदस्यमूल्य हेही एकसारखेच येत आहे. तसेच सदरील क्रमांकावर दर्शविलेले पक्ष नसुन एकल अपक्ष सदस्य आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३१ (३) चे अवलोकन करता " अशा पक्षाच्या किंवा गटाच्या वतीने नामनिर्देशित करावयाच्या पालिका सदस्यांच्या संख्येच्या बाबतीत कोणताही प्रश्न उद्‌भवल्यास, त्याबाबतीत, महानगरपालिकेचा निर्णय अंतिम असेल. " असा उल्लेख आहे.

सबब उपरोक्त नमुद करणेंत आले प्रमाणे अ.नं.६ ते ९ मधील सदस्यमूल्य एकसारखेच येत असल्याने दोन सदस्य निवडीकामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३१ (३) चा विचार करता, दोन सदस्याची निवड महानगरपालिका सभेच्या निर्णयाव्दारे ठरविणे उचित वाटते.

तरी उपरोक्त अ.नं. १ ते ५ प्रमाणे सदस्य नियुक्ती प्रमाणशिर प्रतिनिधीत्व देवून नामनिर्देशनाव्दारे करणे व अ.नं. ६ ते ९ मध्ये दर्शविण्यांत आलेली पक्षनिहाय स्थिती पाहता २(दोन) सदस्याची नियुक्ती महानगरपालिका सभेच्या निर्णयाव्दारे करणे ही बाब धोरणात्मक स्वरुपाची असल्यामुळे मा.महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा बोलाविणे आवश्यक आहे.

सबब आदेशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, प्रस्तावित केलेनुसार मान्य.

यावर मा.महापौर साहेब यांचा अभिप्राय की, निर्णयास्तव मा.महासभेपुढे ठेवा.

अशा बाबतचा प्रस्ताव मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब यांचे अभिप्रायासह मा.महासभेपुढे ठेविला.

**चर्चा :-**

**मा.महापौर तथा पिठासीन अधिकारी :-** यानंतर महिला व बालकल्याण समितीच्या सदस्यपदी नियुक्त करावयाच्या सदस्यांची नांवे गटनेता व त्यांचे प्रतिनिधी यांनी ५ मिनीटांच्या वेळेत पिठासीन अधिकारी यांचेकडेस आणुन द्यावे. (वेळ दुपारी २.०० वाजता)

**मा.महापौर तथा पिठासीन अधिकारी :-** महिला व बालकल्याण समितीवर सदस्य निवडीकरीता विहित वेळ संपलेली आहे. त्यानुसार प्राप्त पाकिटे उघडली असुन नगरसचिवांनी सदर पत्रातील नांवे वाचुन दाखवावीत.

**नगरसचिव :-** महिला व बालकल्याण समितीकरीता नामनिर्देशना करीता गटनेता व त्यांचे प्रतिनिधी यांनी सुचविलेली नांवे खालील प्रमाणे.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे गटनेते श्री.गणेश पुंडलिक भोसले यांनी सुचविलेली नांवे

**१) मा.सौ.वीणा श्रीनिवास बोज्जा,**

भारतीय जनता पक्षाचे गटनेते श्री.दत्तात्रय हरीभाउ कावरे यांनी सुचविलेली नांवे

**१) मा.सौ.मालन सुरेश ढोणे,**

**२) मा.सौ.उषा शिवाजीराव नलवडे,**

भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसचे गटनेता मा.श्री.संदीप भानुदास कोतकर यांनी प्रतिनिधी मा.श्री.सुनिल सर्जेराव कोतकर यांचेमार्फत दिलेली नांवे

**१) मा.सौ.रुपाली निखिल वारे,**

**२) मा.सौ.जयश्री बाबासाहेब सोनवणे,**

शिवसेना व अपक्ष विकास आघाडी यांचे गटनेते मा.श्री.संजय शेंडगे, यांनी सुचविलेली नांवे

**१) मा.सौ.दिपाली नितीन बारस्कर,**

**२) मा.सौ.छाया सुरेश तिवारी,**

**३) मा.सौ.सुनिता भगवान फुलसौंदर,**

**४) मा.सौ.विद्या दिपक खैरे,**

नॅशनॅलिस्ट कॉंग्रेस पार्टी व अपक्ष नगरसेवक यांची शहर विकास आघाडी यांचे गटनेते श्री.खान समद वहाब यांनी सुचविलेली नांवे

**१) मा.सौ.सुनिता किसन भिंगारदिवे,**

**२) मा.श्रीमती.शेख नसीम खानसाहेब**

**३) मा.श्रीमती.इंदरकौर किसनसिंग गंभीर,**

**४) मा.श्रीमती.कलावती सुर्यभान शेळके,**

**५) मा.श्रीमती.मंगला सतिष गुंदेचा,**

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** अनुक्रमांक १५ चे नांव मी **मा.श्रीमती.कुरेशी ख्वाजाबी बाबुलाल,** यांचे सुचवितो.

**मा.श्री.खान समद वहाब :-** श्री.बोराटे यांनी जे नांव सुचविले त्यास मी अनुमोदन देतो.

**मा.श्री.सुनिल कोतकर :-** अनुक्रमांक १६ वे नांव मी **मा.सौ.सविता अशोक कराळे** यांचे सुचवितो.

**मा.श्री.शेख मुदस्सर जहाँगीर :-** मा.श्री.सुनिल कोतकर यांनी जे नांव सुचविले त्यास मी अनुमोदन देतो.

**ठराव :-**

ठरविण्यांत येते की, सर्व पक्षाच्या मा.गटनेत्यांनी सुचविलेल्या १४ मा.महिला व बालकल्याण समिती सदस्यांचे नावास व मा.श्री.बाळासाहेब बोराटे, सदस्य, अहमदनगर महानगरपालिका यांनी मा.महिला व

बालकल्याण समिती सदस्यपदी १५ नंबरचे सुचविलेल्या मा.श्रीमती.ख्वाजाबी बाबुलाल कुरेशी यांचे नावास तसेंच मा.श्री.सुनिल कोतकर यांनी मा.महिला व बालकल्याण समिती सदस्यपदी १६ नंबरच्या सुचविलेल्या मा.सौ.सविता अशोक कराळे यांचे नावास मान्यता देण्यांत येत आहे.

प्राप्त नामनिर्देशनापैकी खालील प्रमाणे सदस्य, **मा.महिला व बालकल्याण समिती सदस्य पदी** विधीग्राहयरित्या नामनिर्देशित झाल्याचे मी घोषित करीत आहे.

| अ.नं. | सदस्यांचे नांव | पक्ष |
|---|---|---|
| १ | मा.सौ.सुनिता किसन भिंगारदिवे | नॅशनॅलिस्ट कॉग्रेस पार्टी व अपक्ष नगरसेवक यांची शहर विकास आघाडी |
| २ | मा.श्रीमती.शेख नसीम खानसाहेब | नॅशनॅलिस्ट कॉग्रेस पार्टी व अपक्ष नगरसेवक यांची शहर विकास आघाडी |
| ३ | मा.श्रीमती.इंदरकौर किसनसिंग गंभीर | नॅशनॅलिस्ट कॉग्रेस पार्टी व अपक्ष नगरसेवक यांची शहर विकास आघाडी |
| ४ | मा.श्रीमती.कलावती सुर्यभान शेळके | नॅशनॅलिस्ट कॉग्रेस पार्टी व अपक्ष नगरसेवक यांची शहर विकास आघाडी |
| ५ | मा.श्रीमती.मंगला सतिष गुंदेचा | नॅशनॅलिस्ट कॉग्रेस पार्टी व अपक्ष नगरसेवक यांची शहर विकास आघाडी |
| ६ | मा.सौ.रुपाली निखिल वारे | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस |
| ७ | मा.सौ.जयश्री बाबासाहेब सोनवणे | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस |
| ८ | मा.सौ.दिपाली नितीन बारस्कर | शिवसेना अपक्ष विकास आघाडी |
| ९ | मा.सौ.छाया सुरेश तिवारी | शिवसेना अपक्ष विकास आघाडी |
| १० | मा.सौ.सुनिता भगवान फुलसौंदर | शिवसेना अपक्ष विकास आघाडी |
| ११ | मा.सौ.विद्या दिपक खैरे | शिवसेना अपक्ष विकास आघाडी |
| १२ | मा.सौ.मालन सुरेश ढोणे | भारतीय जनता पक्ष |
| १३ | मा.सौ.उषा शिवाजीराव नलवडे | भारतीय जनता पक्ष |
| १४ | मा.सौ.वीणा श्रीनिवास बोज्जा | महाराष्ट्र नवनिर्माण सेना |
| १५ | मा.श्रीमती.ख्वाजाबी बाबुलाल कुरेशी | मा.महासभेकडुन नियुक्ती |
| १६ | मा.सौ.सविता अशोक कराळे | मा.महासभेकडुन नियुक्ती |

सुचक : मा.श्री.बाळासाहेब मारुती बोराटे,

अनुमोदक : मा.श्री.सुनिल सर्जेराव कोतकर,

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-

महापौर तथा पिठासीन अधिकारी,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : ४६** **दिनांक : १५/०२/२०१४.**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेमध्ये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या) नियम २००७ अन्वये प्रमाणशिर प्रतिनिधीत्व देवुन नामनिर्देशनाव्दारे नामनिर्देशित सदस्यांची नियुक्ती करणे बाबत...

-- ** --

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिकेमध्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या) नियम २०१२ अन्वये प्रमाणशिर प्रतिनिधीत्व देवुन नामनिर्देशनाव्दारे नामनिर्देशित ५ (पाच) सदस्यांची नियुक्ती करणे बाबत...

विनंती रिपोर्ट सादर करण्यांत येतो की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या) नियम २०१२अन्वये अहमदनगर महानगरपालिके मध्ये प्रमाणशिर प्रतिनिधीत्व देवून नामनिर्देशनाव्दारे सदस्यपदी नेमण्याची तरतुद आहे.

**उपरोक्त उल्लेखित केलेल्या नियमामधील पुढील नियम क्रमांकानुसार :-**

**३. नामनिर्देशित सदस्यांची संख्या निश्चित करणे :-** नियम ४ मधील तरतुदींस अधीन राहून सार्वत्रिक निवडणुकीनंतर निवडणुकांचे निकाल अधिसुचित झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्यानंतर लगतच घेण्यात येणा-या महापालिकेच्या बैठकीत, पाच व्यक्तींचे नामनिर्देशन,नामनिर्देशीत पालिका सदस्य म्हणून करील.

**४. नामनिर्देशनासाठी अर्हता :-** एखाद्या व्यक्तीकडे पालिका प्रशासनाचे विशेष ज्ञान अथवा अनुभव असेल ती व्यक्ती नामनिर्देशित पालिका सदस्याच्या पदासाठी उमेदवार म्हणून नामनिर्देशीत केली जाण्यास पात्र असेल जर ती व्यक्ती -,

**(क)** राज्यात मान्यता प्राप्त व नोंदणीकृत वैद्यक व्यवसायी म्हणून किमान पाच वर्षे काम केलेली असेल ,किंवा

**(ख)**किमान पाच वर्ष शिक्षणतज्ज्ञ म्हणून काम केलेली असेल, यामध्ये मान्यताप्राप्त शाळा किंवा महाविद्यालयाच्या निवृत्त प्राध्यापक, व्याख्याता, मुख्याध्यापक यांचा समावेश असेल, किंवा

**(ग)** सनदी लेखापाल किंवा परिव्यय लेखापाल म्हणून कमीत कमी ५ वर्षाचा अनुभव धारण केलेली असेल, किंवा

**(घ)** कमीत कमी पाच वर्षांचा व्यावसायिक अनुभव असलेली मान्यताप्राप्त विद्यापीठाची अभियांत्रिकी पदवी धारक असेल, किंवा

**(ड.)** राज्यात कमीत कमी पाच वर्षाकरीता अभिवक्ता किंवा मान्यताप्राप्त विद्यापीठाची कायद्यामधील पदवी धारक व राज्यात विधी क्षेत्रात काम करण्याचा कमीत कमी पाच वर्षांचा अनुभव असलेली असेल, किंवा

**(च)** नगरपरिषदेचा मुख्य अधिकारी किंवा महानगरपालिकेचा सहाय्यक आयुक्त किंवा उपायुक्त म्हणून काम करण्याचा किमान पाच वर्षांचा अनुभव असलेली किंवा किमान दोन वर्षांचा अनुभव असलेली महानगरपालिकेतून आयुक्त म्हणून सेवानिवृत्त झालेली असेल, किंवा

**(छ)** महानगरपालिका किंवा नगरपरिषद क्षेत्रात कार्यरेत असणा-या आणि समाजकल्याण कार्यामध्ये गुंतलेल्या मुंबई सार्वजनिक विश्वस्त संस्था अधिनियम, १९५० खाली नोंदणीकृत समाजाधिष्ठित अशासकीय संघटनेचा पदाधिकारी म्हणून किमान पाच वर्षांचा अनुभव असलेली असेल.

**५. " पालिका सदस्यांचे नामनिर्देशन :- (१)** पालिका सदस्यांचे नामनिर्देशन करण्यासाठी आयुक्त महानगरपालिकेतील सभागृह नेता, विरोधी पक्ष नेता आणि प्रत्येक मान्यताप्राप्त अथवा नोंदणीकृत पक्षांच्या किंवा गटांच्या नेत्यांशी विचारविनिमय करुन आणि अशा पक्षांचे आणि गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेऊन महानगरपालिकेला योग्य व्यक्तींच्या नावाची नामनिर्देशित सदस्य म्हणून नेमणूक करण्यासाठी शिफारस करतील. अशा विचारपुस केलेल्या व्यक्तींची संख्या नियम ३ प्रमाणे शिफारस करावयाच्या पालिका सदस्यांच्या संख्येपेक्षा अधिक नसावी.

परंतु, मान्यताप्राप्त पक्षांचे किंवा गटांचे किंवा आघाडीचे किंवा फ्रंटचे तौलनिक संख्याबळ विचारात घेउन नामनिर्देशित सदस्यम्हणून नामनिर्देशन करण्यासाठी शिफारस करताना यथास्थिती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ३१ अ मधील तरतुदीनुसार बनविलेल्या मान्यताप्राप्त अथवा नोंदणीकृत पक्षांचे किंवा गटांचे किंवा आघाडीचे फ्रंटचे तौलनिक संख्याबळानुसार आयुक्त, प्रथम नामनिर्देशित सदस्य म्हणून नामनिर्देशनासाठी पूर्णांक विचारात घेईल आणि त्यानंतरही जर एक किंवा अधिक जागा शिल्लक राहिल्यास अपूर्णांकामध्ये ज्या मान्यताप्राप्त किंवा नोंदणीकृत पक्षाची किंवा गटांचे किंवा आघाडीचे किंवा फ्रंटचे संख्याबळ सर्वात जास्त आहे, तेथून सुरुवात करुन उतरत्या क्रमाने उर्वरित जागांचे वाटप पूर्ण करेल :

परंतु , आणखी असे की, वरील परंतुकात नमूद केल्यानुसार अपूर्णांकातील संख्याबळ उतरत्या क्रमाने विचारात घेउन नावांचे नामनिर्देशन करताना, जर दोन किंवा अधिक मान्यताप्राप्त किंवा नोंदणीकृत पक्ष किंवा गट किंवा आघाडीची किंवा फ्रंटची अपूर्णांकातील संख्या सारखीच असल्यास, आयुक्त, अशा मान्यताप्राप्त किंवा नोंदणीकृत पक्ष किंवा गट किंवा आघाडी किंवा फ्रंटमधून नामनिर्देशित सदस्यांची शिफारस करण्यासाठी निवड, अशा सर्व संबंधित पक्ष किंवा गट किंवा आघाडी किंवा फ्रंटच्या उपस्थितीत चिठ्ठया टाकून करील.

**(२)** आयुक्तांनी केलेल्या शिफारशींचा विचार करुन महानगरपालिका, पालिका सदस्यांचे नामनिर्देशन करील :

परंतु आयुक्तांनी अशाप्रकारे शिफारस केलेल्या व्यक्तीची शिफारस महानगरपालिकेने अमान्य करावयाची ठरविल्यास त्याबाबतची कारणे महानगरपालिकेला नोंद करावी लागतील. :

परंतु आणखी असे की, नियम ४ मधील (क) ते (छ) मधील अर्हता असणा-या प्रत्येकी एका व्यक्तीची पालिका सदस्यम्हणून नामनिर्देशन सुनिश्चित करण्याचा प्रयत्न करण्यात यावा.

**६. पालिकेतील नामनिर्देशित सदस्यांची नांवे प्रसिध्द करणे :-** याप्रमाणे नामनिर्देशित केलेल्या सदस्यांची नावे शक्य तितक्या लवकर पालिका सचिव, महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यासाठी पाठवील.

**७. प्रासंगिक रिक्त पदे :-** नामनिर्देशित पालिका सदस्याचे एखादे पद रिक्त होईल तेव्हा ते रिक्त पद भरण्याकरिता या नियमांच्या तरतुदी योग्य त्या फेरफारांसह लागू होतील.

**८. नामनिर्देशित पालिका सदस्यांना प्रमाणपत्र देणे. :-** नामनिर्देशित पालिका सदस्यांची नावे महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्यानंतर आयुक्त, यासोबत जोडलेल्या नमुन्यात प्रत्येक नामनिर्देशित पालिका सदस्यांना प्रमाणपत्र देईल. असे नियम आहेत.

उपरोक्त नियमाप्रमाणे नियम क्रमांक ३ नुसार ५ (पाच) नामनिर्देशित सदस्यांची नेमणूक करणेसाठी शिफारस करावी लागेल.

मा.विभागीय आयुक्त, नाशिक यांनी यांचे पत्र क्र.नपा-१/२/जा.क्र.३३५/१४ दिनांक १५-०१-२०१४ च्या आदेशान्वये शहरविकास आघाडी या २२ नगरसेवकांच्या गटांस मान्यता दिली आहे.

तसेच मा.विभागीय आयुक्त, नाशिक यांनी यांचे पत्र क्र.नपा-१/२/जा.क्र.३३२/१४ दिनांक १५-०१-२०१४ च्या आदेशान्वये भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस आघाडी या ११ नगरसेवकांच्या गटांस मान्यता दिली आहे.

तसेच महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांच्या ४ नगरसेवकांच्या गटनोंदणीसाठी मा.विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचे पत्र क्र.नपा-१/२/जा.क्र.३३४/१४ दिनांक १५/०१/२०१४ अन्वये मान्यता दिली आहे.

तसेच भारतीय जनता पक्ष यांच्या ९ नगरसेवकांच्या गटनोंदणीसाठी मा.विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचे पत्र क्र.नपा-१/२/जा.क्र.३३३/१४ दिनांक १५/०१/२०१४ अन्वये मान्यता दिली आहे.

तसेच शिवसेना यांच्या १८ नगरसेवकांच्या गटनोंदणीसाठी मा.विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचे पत्र क्र.नपा-१/२/जा.क्र.८१०/१३ दिनांक २३/०१/२०१४ अन्वये मान्यता दिली आहे.

उपरोक्त प्रमाणे नामनिर्देशित पाच (५) सदस्यांची सदस्यपदी नियुक्ती करावयाची झाल्यास पक्षनिहाय सदस्य नियुक्ती बाबतचा तक्ता खालील प्रमाणे.

अ) एकुण सदस्य संख्या - ६८

ब) नियुक्त करावयाची सदस्य संख्या - ०५

**क) एकुण सदस्य संख्या ÷ नियुक्त सदस्य संख्या = प्रती सदस्य मुल्य.**

**६८ ÷ ०५ = १३.६**

| अ.नं. | पक्ष | संख्या सदस्य बळ | मुल्य | पक्ष निहाय सदस्य मुल्य | नियुक्त सदस्य संख्या | | पक्ष निहाय नियुक्त करावयाची सदस्य संख्या. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | प्रथम स्तर | व्दितीय स्तर | |
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** | **७** | **८** |
| १ | शहर विकास आघाडी | २२ ÷ | १३.६ | १.६१ | १ | १ | २ |
| २ | भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस | ११ ÷ | १३.६ | ०.८० | -- | १ | १ |
| ३ | शिवसेना व अपक्ष विकास आघाडी | १८ ÷ | १३.६ | १.३२ | १ | -- | १ |

| अ.नं. | पक्ष | संख्या सदस्य बळ | मुल्य | पक्ष निहाय सदस्य मुल्य | नियुक्त सदस्य संख्या प्रथम स्तर | नियुक्त सदस्य संख्या व्दितीय स्तर | पक्ष निहाय नियुक्त करावयाची सदस्य संख्या. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| ४ | भारतीय जनता पक्ष | ९ | ÷ १३.६ | ०.६६ | -- | १ | १ |
| ५ | महाराष्ट्र नवनिर्माण सेना | ४ | ÷ १३.६ | ०.२९ | -- | -- | -- |
| ६ | अपक्ष | १ | ÷ १३.६ | ०.०७ | -- | -- | -- |
| ७ | अपक्ष | १ | ÷ १३.६ | ०.०७ | -- | -- | -- |
| ८ | अपक्ष | १ | ÷ १३.६ | ०.०७ | -- | -- | -- |
| ९ | अपक्ष | १ | ÷ १३.६ | ०.०७ | -- | -- | -- |

तरी उपरोक्त अ.नं. १ ते ४ प्रमाणे प्रमाणशिर प्रतिनिधीत्व देवून नामनिर्देशनाव्दारे सदस्याची नियुक्ती महानगरपालिका सभेच्या निर्णयाव्दारे ठरविणे आवश्यक असल्यामुळे मा.महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा बोलाविणे आवश्यक आहे.

उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करावयाची झाल्यास सदरील प्रस्तावावर निर्णय घेणेकरीता मा.महापौर साहेब यांचेकडुन महासभेची तारीख प्राप्त झालेवर सभागृह नेता, विरोधी पक्ष नेता, संबंधित पक्षांचे गटनेते यांना त्यांच्या गटाच्या संख्याबलाबाबत कळवुन मा.नामनिर्देशित सदस्य पदासाठी आवश्यक त्या संख्येच्या सदस्यांचे नामनिर्देशन पत्र मा.महासभेपुढे सादर करणे बाबत कळवावे लागेल.

तरी सदरचा प्रस्ताव मा.महासभेच्या मंजूरीस पाठविणेस, त्याचप्रमाणे मा.महापौर साहेब यांनी मा.महासभेची तारीख निश्चित केलेनंतर संबंधित पक्षाचे गटनेते यांना नामनिर्देशित सदस्य पदासाठी मा.सदस्यांचे नावाचे नामनिर्देशन नियुक्ती पत्र मा.महासभेपुढे सादर करणे बाबत कळविणेस्तव आदेशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, प्रस्तावित केलेनुसार मान्य.

यावर मा.महापौर साहेब यांचा अभिप्राय की, निर्णयास्तव मा.महासभेपुढे ठेवा.

अशा बाबतचा प्रस्ताव मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब यांचे अभिप्रायासह मा.महासभेपुढे ठेविला.

**चर्चा :-**

**मा. महापौर तथा पिठासीन अधिकारी :-** नगरसचिव यांनी विषय क्रमांक ४६ करीता मा.आयुक्त यांनी छाननी करुन केलेल्या प्रस्तावानुसार नावांची यादी सादर करावी.

**नगरसचिव :-** मा. महापौर तथा पिठासीन अधिकारी यांचेकडे मा नामनिर्देशनाद्वारे गटनेता यांचेकडील नामनिर्देशीत करावयाच्या सदस्यांची मा.आयुक्त यांचेकडेस प्राप्त झालेली व वैध ठरलेली नावाची यादी सादर करतो.

**मा. महापौर तथा पिठासीन अधिकारी :-** प्राप्त नावे नगरसचिव वाचुन दाखवतील.

**नगरसचिव :-** नामनिर्देशित करावयाची गटनेता यांचेकडील प्राप्त वैध नावे पुढील प्रमाणे.

१. मा.श्री. अशोक उर्फ अभय जगन्नाथ आगरकर

२. मा.श्री. विक्रम अनिल राठोड

३. मा.श्री. सुभाष सोपानराव लोंढे

४. मा.श्री. कैलास रामभाउ गिरवले

५. मा.श्री. संजय हरिभाउ घुले

याप्रमाणे ही पाच नामनिर्देशन प्राप्त झाले असुन ती वैध आढळुन आली आहेत.

**मा.श्री. दिप चव्हाण :-** या नावाची कायदयातीत तरतुदीनुसार घोषणा करायला पाहिजे.

**मा.महापौर तथा पिठासीन अधिकारी :-** नगरसचिव यांनी जी पाच नावे वाचुन दाखविली ती मा.आयुक्त यांनी छाननी केली असुन ती नावे स्विकृत सदस्य म्हणून घोषीत करीत आहे. जे नवीन स्विकृत सदस्य यांची निवड झालेली आहे त्यांनी सभागृहात सत्कारासाठी उपस्थित रहावे. सत्कार संपल्यानंतर नियमानुसार वंदे मातरम होवून सभा समाप्त होईल.

वंदे मातरम राष्ट्रगीत झाले.

---*---

**ठराव :-**

ठरविण्यांत येते की, मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांचेकडे प्राप्त वैध पाच नामनिर्देशन खालील प्रमाणे असुन त्यांना **मा.नामनिर्देशित सदस्य पदी** विधीग्राहयरित्या नामनिर्देशित झाल्याचे मी घोषित करीत आहे.

| अ.नं. | सदस्यांचे नांव | पक्ष |
|---|---|---|
| १ | मा.श्री.आगरकर अशोक उर्फ अभय जगन्नाथ | भारतीय जनता पक्ष |
| २ | मा.श्री.राठोड विक्रम अनिल | शिवसेना व अपक्ष विकास आघाडी |
| ३ | मा.श्री.लोंढे सुभाष सोपानराव | भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस |
| ४ | मा.श्री.गिरवले कैलास रामभाउ | नॅशनॅलिस्ट कॉग्रेस पार्टी व अपक्ष नगरसेवक यांची शहर विकास आघाडी |
| ५ | मा.श्री.घुले संजय विठ्ठलराव | नॅशनॅलिस्ट कॉग्रेस पार्टी व अपक्ष नगरसेवक यांची शहर विकास आघाडी |

सुचक : मा.श्री.बाळासाहेब मारुती बोराटे,

अनुमोदक : मा.श्री.सुनिल सर्जेराव कोतकर,

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-

महापौर तथा पिठासीन अधिकारी,
अहमदनगर महानगरपालिका.